वर्ष-०८ अंक-२० मुंबई, मंगळवार ०५ मार्च ते ११ एप्रिल - २०२२ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

•संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2

सायबर गुन्हांबाबत पोलिस उदासीन

3 → पाकिट चोरल्याच्या संशयातून नालासोपाऱ्यात भर रस्त्यात जमावाकडून महिलेला मारहाण

पुण्यात गुंडांचा उच्छाद, फुकट भाजी न दिल्याने तरुणाला पाया पडायला लावलं ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## 17 वर्षीय मुलगी पाच महिन्यांची गर्भवती

### युट्यूबवर व्हिडीओ पाहून गर्भपात!




नागपूर : नागपूर तालुक्यातील एका गावातलं हे प्रकरण आहे. सतरा वर्षीय मुलीचे एका 27 वर्षीय युवकासोबत सूत जुळलं. दोन वर्षांपासून त्याचं प्रेमप्रकरण सुरू असल्याची माहिती आहे. वर्षभरापूर्वी तो युवक नागपुरात कामानिमित्त आला. एमआयडीसी (MIDC) परिसरात भाड्याने खोली करून राहू लागला. त्यामुळं त्यांच्या भेटीगोटी कमी झाल्या. पण, तरीही ते संधी मिळेल तेव्हा भेटत होते. कधी-कधी हा युवक नरखेडला (Narkhed) जात असे, तर कधी-कधी ती नागपूरला येत असे. काही दिवसांपूर्वी ती नागपूरला आली. रात्री त्याच्या खोलीवर थांबली. दोन-तीन दिवस ती इकडं थांबली होती. त्यावेळी त्यांच्यात शरीरसंबंध निर्माण जाले. यातून तिला गर्भधारणा (Pregnancy) झाली. मळमळ, उलटीचा तिला त्रास होऊ लागला.

गर्भपात करण्यासाठी पाहिले व्हिडीओ ही बाब मुलीच्या लक्षात आल्यानंतर तीनं युवकाला सांगितलं. तो रुग्णालयात काम करत असल्यानं त्यानं काही औषधी तिला सांगितली. तिने ती औषध खाल्ली पण, काही परिणाम झाला नाही. चार-पाच महिन्यांची गर्भवती झाल्यानंतर ती हादरली. आता काय करावे तिला काही सुचेना. गर्भपात कसा करतात. यासाठी तिनं युट्युबवर काही व्हिडीओ पाहिले. काढा पिऊन मुलगी बेशुद्ध त्यात मुलीला काही गावरानी औषधांची माहिती मिळाली. तिला काढा तयार केली. तो घेतला. त्यामुळं तिचा गर्भपात झाला. घरी मुलगी बेशुद्ध पडली होती. बाजूला चार-पाच महिन्यांचे अर्भक होते. पालकांच्या ही बाब लक्षात आली. त्यांनी तिला मेडिकलमध्ये दाखल केले. नागपूर ग्रामीण पोलिसांना प्रकरणाची माहिती देण्यात आली. युवकाविरोधात पोक्सा कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलाय. ग्रामीण पोलिसांनी हे प्रकरण आता एमआयडीसी पोलिसांकडे वर्ग केले. पोलीस तिच्या प्रियकराचा शोध घेत आहेत.

# महसूल अधिकारी 'आरडीएक्स' दंडाधिकारी जिवंत बॉम्ब

## नाशिक पोलीस आयुक्तांचे महासंचालकांना सनसनाटी पत्र

नाशिकः महसूल अधिकारी (Revenue Officer) 'आरडीएक्स', तर दंडाधिकारी डिटोनेटर बनत आहेत. त्यामुळे जिवंत बॉम्ब तयार होत आहेत. जिल्ह्यात भूमाफियांनी सर्वसामान्यांची अक्षरशः लूट सुरू केलीय. महसूल अधिकारी त्यांच्या कह्यात आहेत. या भूमाफियांपासून नागरिकांना अभय मिळावे म्हणून महसूल दंडाधिकारी यांचे मुख्य कार्यकारी अधिकार आणि ग्रामीण पोलीस अधीक्षकांचे अधिकार पोलीस आयुक्तांकडे द्यावेत, अशी मागणी करणारे खळबळजनक पत्र नाशिकचे (Nashik) नेहमी चर्चेत राहणारे पोलीस आयुक्त (Police Commissioner) दीपक पांडेय यांनी पोलीस महासंचालकांना पाठवले आहे. दीपक पांडेय यांनी नाशिकचे पोलीस आयुक्त म्हणून 4 सप्टेंबर 2020 रोजी पदभार स्वीकारला. त्यानंतर गेल्या काही दिवसांत त्यांच्या नाना भूमिका, कार्यवाह्या आणि पत्रापत्रीच्या फैरीने प्रशासनाचा कारभार चव्हाट्यावर आला आहे. पांडेय यांनी नुकतीच गुढीपाडव्याच्या नववर्ष स्वागत समितीला कार्यक्रमाची परवानगी



नाकारली होती. त्यानंतरही नाशिकमध्ये आरोप-प्रत्यारोप आणि वादाचा धुरळा उठला होता.

**अधिकार स्वतःकडे मागितले**

पोलीस आयुक्त दीपक पांडेय यांनी महसूल दंडाधिकारी यांचे मुख्य कार्यकारी अधिकार आणि ग्रामीण पोलीस अधीक्षकांचे अधिकार पोलीस आयुक्तांकडे म्हणजेच पर्यायाने स्वतःकडे द्यावेत असे पत्रात म्हटले आहे. ते आपल्या पत्रात पुढे म्हणतात की, या दोन्ही विभागाकडून अधिकाराचा योग्य वापर होत नाही. महसूल अधिकारी 'आरडीएक्स', तर दंडाधिकारी डिटोनेटर बनत आहेत. त्यामुळे जिवंत बॉम्ब तयार होत आहेत. जिल्ह्यात भूमाफियांनी सर्वसामान्यांची अक्षरशः लूट सुरू केलीय. या भूमाफियांपासून नागरिकांना अभय मिळावे म्हणून हे पाऊल उचलावे. सध्या पोलीस आयुक्तांचे 3500 तर ग्रामीण विभागाचे 3600 पोलीस मनुष्यबळ आहे. त्यातून एकच पोलीस आयुक्तालय साकारावे.

**इतर जिल्ह्यांसाठीही मागणी**

पोलीस आयुक्त दीपक पांडेय आपल्या पत्रात म्हणतात की, नाशिक जिल्ह्यासाठी एकच पोलीस आयुक्तालय असावे. सारे अधिकार पोलीस आयुक्तांकडे असावेत. ग्रामीण पोलीस दल आयुक्तालयात आल्यास गतिमान प्रशासन कार्यरत होईल. ग्रामीण आणि शहर हद्द राहणार नाही. शेवटी या साऱ्यांच्या कामाचे स्वरूप एकच आहे. त्यामुळे जिल्हा दंडाधिकारी कार्यालय शाखा पोलीस आयुक्तालयातच विलीन करावी. एकाच जिल्ह्यात शहर आणि जिल्हा या दोन यंत्रणा असू नयेत. नाशिक, औरंगाबाद, पुणे, ठाणे, नागपूर, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर येथे सर्व जिल्ह्यासाठी फक्त पोलीस आयुक्तालयाचा दर्जा द्यावा, अशी मागणी त्यांनी केलीय.

**मालेगावचा बट्टा पुसेल**

पोलीस आयुक्त दीपक पांडेय आपल्या पत्रात म्हणतात की, नाशिक पोलीस आयुक्तालयाची यंत्रणा खमकी आणि सक्षम आहे. तिच्याकडे जिल्ह्याचे अधिकार असतील, तर मालेगावला लागलेला संवेदनशीलतेचा बट्टा पुसला जाईल. येथे स्वंतत्र आयुक्तालयाची गरज नसेल. शिवाय जिल्ह्यातील औद्योगित वसाहतीत कामगार आणि व्यवस्थापनात नेहमीच वादाची ठिणगी पडते. हे वाद तात्काळ मिटवण्यासाठी एमआयडीसी व महसूल यंत्रणेचे संबंधित अधिकार पोलीस आयुक्तालयाकडे वर्ग करावेत.

## आयपीएल सामन्यांवर सट्टा लावणाऱ्या तिघांच्या पोलिसांनी आवळल्या मुसक्या



पुणे : आयपीएल (IPL) सामन्यावर सट्टा (Betting) लावल्याप्रकरणी तीन जणांना अटक (Arrest) करण्यात आली आहे. तर त्यांच्याकडून काही साहित्यही जप्त करण्यात आले आहे. पुण्यातील एमसीए स्टेडियमवर दिल्ली कॅपिटल्स (डीसी) आणि गुजरात टायटन्स (जीटी) यांच्यातल्या आयपीएल सामन्यावर सट्टा लावला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार काळेवाडी परिसरातील एका फ्लॅटध्ये शनिवारी रात्री पिंपरी चिंचवड पोलिसांनी छापा टाकला. याविषयी पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त कृष्ण प्रकाश म्हणाले, "मी आयपीएल सामन्यासाठी सुरक्षा तैनातीवर देखरेख करत होतो, तेव्हा मला काही लोक सट्टा स्वीकारतात आणि सट्टेबाजीचे रॅकेट चालवतात याबद्दल ठोस माहिती मिळाली. हे लोक काही जणांकडून सट्टा घेत होते आणि सट्टेबाजांपर्यंत पोहोचवत होते, अशी माहिती समोर आली आहे. मी पुढील कारवाईसाठी संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कक्षाला माहिती दिली.सेलमधील सहाय्यक निरीक्षक हरीश माने म्हणाले, "आम्ही संध्याकाळी 7च्या सुमारास परिसराची पाहणी केली. हितीची प्राथमिक पडताळणी केल्यानंतर आम्ही काळेवाडी येथील निवासी सोसायटीतील फ्लॅटवर छापा टाकला.

## नैराश्यातून घर सोडून गेलेल्या व्यक्तीचा वैनगंगा नदीत मृतदेह आढळला





भंडारा : नैराश्यातून घर सोडून गेलेल्या व्यक्तीचे अखेर दोन दिवसानंतर वैनगंगा नदीत मृतदेह मिळाल्याची घटना भंडारा शहरात घडली आहे. नरेश मखीजा (42) असे मयत इसमाचे नाव आहे. मखीजा याने आत्महत्या (Suicide) केल्याची प्राथमिक माहिती आहे. वैनगंगा नदीवरील कारधा छोट्या पुलाजवळ एक मृतदेह तरंगताना दिसल्याने पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी मृतदेह बाहेर काढत उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवला. पोलिस नरेश यांच्या मृत्यूबाबत अधिक तपास करीत आहेत. दोन दिवसापासून बेपत्ता होते नरेश माखीजा नरेश सिंधी कॉलनी येथे राहतात. गेल्या दोन दिवसापासून ते घरी आले नव्हते. त्यामुळे कुटुंबीयांनी त्यांचा शोध सुरू केला. मात्र नरेश काहीत पत्ता लागत नव्हता. अखेर कुटुंबीयांनी भंडारा शहर पोलिसात नरेश बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. त्यानंतर सोमवारी सकाळी वैनगंगा नदीवरील कारधा पुलाजवळ एक मृतदेह तरंगताना आढळला. ग्रामस्थांनी तात्काळ पोलिसांना याची महिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मृतदेह बाहेर काढला आणि उत्तरीय तपासणीसाठी पाठवला.

प्राथमिकदृष्ट्या नरेश यांनी आत्महत्या केल्याचे सांगण्यात येत आहे. याबाबत पोलिस सखोल तपास करीत आहेत. अमरावतीत यात्रेत गेलेल्या युवकाचा तलावात बुडून मृत्यूअमरावतीच्या चांदूर रेल्वे तालुक्यातील सावंगा (विठोबा) येथे यात्रेत आलेल्या एका 23 वर्षीय युवकाचा मालखेड तलावाच्या पाण्यात आंघोळ करताना बुडून मृत्यू झाल्याची घटना रविवारी सकाळी घडली.

## अंबाजोगाईत पुजाऱ्याची हत्या, गुढीपाडव्याला लाडका 'देवबप्पा' गेला, गावकरी हळहळले

### दुपारी 1 वाजताच्या सुमारास त्यांच्यावर एका माथेफिरुने चाकूने अनेक वार केले

अंबाजोगाई : मंदिराच्या पुजाऱ्याचा चाकूने भोसकून खून (Priest Murder) झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. बीड जिल्ह्यात अंबाजोगाईच्या जवळ शेपवाडीत (Beed Crime) हा प्रकार घडला आहे. माथेफिरुने चाकूचे अनेक वेळा वार करुन पुजाऱ्याची हत्या केली. संतोष दासोपंत पाठक असं हत्या झालेल्या पुजाऱ्याचं नाव आहे. ते देवबप्पा या नावाने गावात परिचित होते. अंबाजोगाई तालुक्यातील शेपवाडी येथे हनुमान मंदिराचे पुजारी होते. चाकू हल्ल्यात गंभीर जखमी झाल्यानंतर



पाठक गुरुजींना रुग्णालयात नेण्यात आले, परंतु त्यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले.

संतोष पाठक यांच्याकडे शेपवाडी गावातील सर्व पूजा अर्चा करण्यात येतात. गुढीपाडवा असल्याने ते सकाळपासून शेपवाडी गावातील हनुमान मंदिरात थांबले होते. दुपारी 1 वाजताच्या सुमारास त्यांच्यावर एका माथेफिरुने चाकूने अनेक वार केले. ग्रामस्थांनी गंभीर जखमी झालेल्या पाठक यांना तातडीने स्वाराती रुग्णालयात दाखल केले, परंतु तिथे डॉक्टरांनी त्यांना मयत घोषित केले. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

## लेखापालाला सक्तमजुरी



पुणे : बनावट कागदपत्रांच्या आधारे लाखो रुपयांचे वाहन कर्ज वाटप करून बँकेची फसवणूक करणाऱ्या लेखापालाला केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) विशेष न्यायालयाने पाच वर्षे सक्तमजुरी आणि वीस हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. 'बँकेच्या फसवणुकीसारखे गंभीर गुन्हे मोठ्या प्रमाणात होत असून, राष्ट्राच्या सर्वांगीण वाढीला आणि अर्थव्यवस्थेला प्रचंड हानिकारक ठरत आहेत,' अशी टिप्पणीही न्यायालयाने निकालपत्रात केली आहे.विशेष न्यायाधीश गिरीश जी. भालचंद्र यांनी हा निकाल दिला. या प्रकरणी दोषारोप निश्चित झाल्यावर आरोपी फरारी झाला होता. गेल्या वर्षी 'सीबीआय'ने त्याला जेरबंद केल्यानंतर न्यायालयाने जलदगतीने खटला चालविला.

## शिक्षणाच्या माहेरघरात पालकांना बाऊन्सर्सकडून पुन्हा मारहाण, पुण्यातील धक्कादायक प्रकार

शिक्षणाच्या माहेरघरात पालकांना बाऊन्सर्सकडून पुन्हा मारहाण, पुण्यातील धक्कादायक प्रकार

बिबवेवाडी येथील शाळेतील बाऊन्सरकडून पालकांना झालेल्या धक्काबुक्कीचा मुद्दा विधानसभेतही चर्चिला गेला होता. शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी शाळेत बाऊन्सर न ठेवण्याच्या त्यावेळी सूचना दिल्या होत्या. या प्रकारामुळे शिक्षणमंत्र्यांच्या आदेशाला



शाळेकडून केराची टोपली दाखवली गेल्याचे स्पष्ट झाले आहे. आता शिक्षणमंत्री अशा मुजोर शाळांवर काय कारवाई करतात, ते पाहावे लागेल. या प्रकारानंतर पालकांनी नाराजी व्यक्त केली आहे.ज्या महिला पालक पुष्पा चौधरी यांच्यासोबत या शाळेतील बाऊन्सर्सने धक्काबुक्की केली त्यांनी आपली आपबिती सांगताना संताप व्यक्त केला आहे. "मी माझ्या मुलाला शाळेत सोडायला आणि फी भारयला गेले होते. मात्र, शाळा प्रशासन फी घेण्यास तयार नव्हते आणि मुलालाही शाळेत घेण्यास तयार नव्हते.

## पाठलाग करून चोर जेरबंद



पायी निघालेल्या दोघांना कोयत्याचा धाक दाखवून मोबाइल आणि पैशाची चोरी करणाऱ्या दोघांना रविवारी कोनगाव पोलिसांनी पाठलाग करून पकडले असून त्यांच्याकडून चोरीचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी कोनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. रविवारी पहाटे फरमान याकुब रैन आणि त्याचा मित्र आकीब नजीमुद्दीन अन्सारी हे दोघे भिवंडी-कल्याण रस्त्यावरून चालत निघाले होते. येथील एका किराणा दुकानासमोर आल्यानंतर दुचाकीवरून आलेल्या दोघांनी त्यांच्यासमोर दुचाकी थांबवली. दोघेही आरोपी दुचाकीवरून खाली उतरले. त्यातील एकाने फरमानसह दोघांना कोयत्याचा धाक दाखवला. दुसऱ्या आरोपीने या दोघांना मारहाण करत फरमान याच्याकडील मोबाइल आणि १ हजार २०० रुपयांची रोकड जबरदस्तीने काढून घेतली. आरोपी कल्याणच्या दिशेने पळून जाऊ लागले. तितक्यात फरमान याने आरडाओरडा केल्याने गस्तीवर असलेल्या पोलिसांनी आरोपींचा पाठलाग सुरू केला. काही अंतरावरुन युवराज पवार (१९) आणि निशांत होले (२१) या दोघांना ताब्यात घेतले. दोघेही उल्हासनगरमध्ये राहत असून या दोघांकडून कोयता, दुचाकी आणि चोरीचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

## अकोल्यातून सोयाबिन चोरी करणारी आंतरजातीय टोळी पोलिसांच्या जाळ्यात

अकोला : सोयाबिन चोरी करणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखा अकोला यांनी सोयाबिन चोरी करणाऱ्या टोळीला अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून एकुण ४३,६१,०००/-रुपये चा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे तसेच आरोपींना या गुन्ह्यात मदत करणाऱ्यांना देखील पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.





मिळालेल्या माहितीनुसार दिनांक ०२/०४/२०२२ रोजी गुजरात अंबुजा तेल कंपनीतील मॅनेजर याने त्यांच्या येथून अंदाजे ३२५ क्विंटल सोयाबीन माल चोरी गेल्याचे बाळापूर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली होती . सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेउन मा.पो.अधिक्षक सा. यांनी हा तपास स्थानिक गुन्हे शाखा पोउपनि. मुकुंद देशमुख, पोहेकॉ. दत्ता ढोरे, पोकॉ. संदिप ताले, श्रीकांत पातोंड व रवि पालीवाल यांच्याकडे सोपवून एक पथक तयार केले .या पथकाने दि. ३ एप्रिल रोजी आरोपींचा शोध घेत असतांना पोलिसांना गुप्तबातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, शेगाव जि.बुलढाणा येथील राहणारा विठ्ठल पंजाबराव मेहंगे वय २७ वर्ष, याने गुजरात अंबुजा फॅक्टरी मधुन सोयाबिन चोरी केले आहेत तसेच सहकाऱ्यांच्या मदतीने पोलीस ठाणे हद्दीमधून सोयाबिन चोरी करून मालवाहू वाहनाने सोयाबिन माल त्यांचा राहत्या घरी घेउन गेला आहे, अशी बातमी मिळाल्याने सदर माहिती मा. पोलीस निरिक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, अकोला यांना कळवुन त्यांचे मार्गदर्शना प्रमाणे तपास पथक रवाना केले असता शेगाव येथुन १)विठ्ठल पंजाबराव मेंहंगे वय २७ वर्ष २)देवानंद पंजाबराव मेहंगे वय २४ वर्ष, ३) अविनाश बाळकृष्ण मेहंगे वय २१ वर्ष, सर्व रा. शेगाव यांना ताब्यात घेऊन बारकाईने विचारपूस केली असता त्यांनी हि चोरी सहका-यांचे मदतीने सोयाबीन माल विविध ठिकाणा वरून चोरी केल्याचे सांगीतले. तसेच घरासमोर उभे असलेले सोयाबिन मालाचे कट्टयाने भरलेले मालवाहु वाहनाची विचारपूस केली असता सदरचा सोयाबीन माल हा गुजरात अंबुजा सोयाबीन फॅक्टरी मधुन ६ वेळा चोरी केलेला आहे अशी कबुली त्यांनी दिली त्यांचा अजून काही चोरीचा गुन्हा दाखल आहे का हे तपासले असता त्यांच्यावर अश्या प्रकारचे पोलीस ठाणे बाळापूर येथे तिन गुन्हे, १)पो.ठा .बार्शिटाकळी २) पो.ठा . बोरगाव मंजु ३)पो.ठा पिंजर येथे प्रत्येकी एक गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे एकुण ६ गुन्हयातील चोरी गेलेले १) सोयाबिन माल ४३० क्विंटल किंमत २८,१३,000/-रू व गुन्हयात वापरलेले मालवाहु वाहन किंमत ५,00,000/-रू त्याचप्रमाणे या गुन्ह्यात त्यांना सहकार्य करणारा ३) अनिल त्रंबक घुगे वय ३० वर्ष, यास देखील पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून एकुण - ४३,६१,000/- रूपये चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सोयाबिन चोरीचे टोळीतील सर्व आरोपी हे वाशिम व बुलढाणा जिल्हयातील असल्याचे पोलीस तपासादरम्यान निष्पन्न झाले आहे. पुढील तपासासाठी आरोपी यांना बाळापुर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदर कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री. जी श्रीधर, अपर पोलीस अधीक्षक मोनिका राउत मॅडम, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. संतोष महल्ले यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि. मुकुंद देशमुख, पोहेकॉ. दत्ता ढोरे, पोकॉ. श्रीकांत पातोंड, संदिप ताले, रवि पालीवाल, ओएसआय. गोपीलाल मावळे, शेर अली, महिला पोहेकॉ. अनिता टेकाम, चालक नापोकॉ. अक्षय बोबडे, पोकॉ. विजय कबले स्थागुशा अकोला यांनी केली.

पोलीस बातमी पत्र
मुंबई
२
मुंबई, मंगळवार ०५ मार्च ते ११ एप्रिल - २०२२

## इंधन दरवाढीविरुद्ध थाळीनाद



पेट्रोल-डिझेलचे दर दिवसेंदिवस वाढतच असून, त्यामुळे सर्वसामान्य वाहनचालकांच्या खिशाला मोठी झळ पोहोचत आहे. मात्र, या प्रकरणी केंद्र सरकार ठोस भूमिका घेत नसल्याने शिवसेनेच्या युवासेने त्याविरुद्ध आंदोलन पुकारले असून, रविवारी राज्यभरात इंधन दरवाढीविरुद्ध थाळीनाद करण्यात आला. नाशिकमध्येही शालिमार परिसरातील शिवसेना कार्यालयाजवळ शिवसैनिकांनी 'थाली बजाओ, खुशिया मनाओ' अशी घोषणाबाजी केली.

'अच्छे दिन'चे गाजर दाखवून २०१४ आणि २०१९ मध्ये सलग दोन वेळा केंद्रात भाजपने सत्ता मिळविली आहे. पण, त्यांनी जनतेकडे पाठ फिरविल्याचा आरोप युवासेनेने केला आहे. युवासेनेचे प्रदेश सहसचिव मनीष बागूल यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. नाशिकमधील आंदोलनावेळी 'बहुत हो गई महँगाई की मार, हिंदुस्तान का युवा नहीं होगा बेरोजगार', ही घोषणा हवेत विरल्याची टीका युवासेनेने केली. थाळीनाद करून इंधन दरवाढीचा निषेध करण्यात आला.

# सायबर गुन्ह्यांबाबत पोलिस उदासीन

पुणे : शहरात सायबर गुन्हे वेगाने वाढत असले, तरी स्थानिक पोलिस ठाण्यांकडून हे गुन्हे दाखल करण्यास टाळाटाळ केली जात असल्याची माहिती समोर आली आहे. सायबर पोलिसांनीच तपास करून पोलिस ठाण्यांकडे दाखल करण्यासाठी पाठविलेले पावणे दोनशे गुन्हे अद्याप दाखल झालेले नाहीत. त्यामुळे सायबर गुन्ह्यांबाबत पोलिस कधी गंभीर होणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

पुणे शहरात दर वर्षी सायबर गुन्ह्यांत वाढ होत आहे. पुण्यात २०१९मध्ये साडेसात हजार सायबर अर्जांची नोंद झाली. हीच संख्या २०२१मध्ये १९ हजारांवर गेली. म्हणजेच सायबर गुन्ह्यांत तिप्पट वाढ झाल्याचे दिसून येत आहे. एकीकडे सायबर गुन्ह्यांचे अर्ज वाढत असले, तरी प्रत्यक्ष पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. सायबर गुन्ह्यांबाबत १९ हजारांहून अधिक अर्ज दाखल होत असताना प्रत्यक्षात दोनशे ते तीनशेच गुन्हे दाखल होत असल्याचे दिसून आले आहे. पुणे शहरात वाढते सायबर गुन्हे लक्षात घेऊन स्वतंत्र सायबर पोलिस ठाणे सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे आता सायबर गुन्ह्यांची तक्रार या ठिकाणी घेतली जाते. स्थानिक पोलिसांना सायबर गुन्हा घडल्याचे सांगितल्यानंतर त्यांच्याकडून थेट सायबर पोलिस ठाण्याकडे बोट दाखविले जाते.

सायबर पोलिस ठाण्यात तक्रार घेऊन आलेल्या व्यक्तीचा तक्रार अर्ज घेतला जातो. तो फारच गंभीर स्वरूपाचा असेल; तर त्यावर तत्काळ तपास केला जातो; अन्यथा त्या तक्रार अर्जाची चौकशी करून त्यामधील आरोपींबाबत तांत्रिक माहिती काढली जाते. तपासात काही गोष्टी निष्पन्न झाल्यानंतर तो अर्ज ती व्यक्ती राहत असलेल्या स्थानिक पोलिस ठाण्यांकडे पाठवून गुन्हा दाखल करण्यास सांगितले जाते. त्यामध्ये स्थानिक पोलिस ठाण्याने तपास करावा, अशा सूचना केल्या जातात. परंतु, सायबर पोलिसांनी दाखल करण्यासाठी पाठविलेला गुन्हाही स्थानिक पोलिस ठाण्यांकडून दाखल केला जात नाही. स्थानिक पोलिस ठाण्यांकडे पाठविलेले गुन्हे दाखल करण्यास उशीर लागत असल्याचे दिसून आल्यानंतर सायबर पोलिसांनी शून्य क्रमांकाने गुन्हा दाखल करून पाठविण्यास सुरुवात केली. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.



तपास नको म्हणून काणाडोळा

माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार (आयटी ॲक्ट) सायबर गुन्हे दाखल होतात. या गुन्ह्यांचा तपास करण्याचे अधिकार फक्त पोलिस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याला आहेत. अगोदरच पोलिस ठाण्यात निरीक्षकांकडे वेगवेगळे गुन्हे तपासाला असतात. सायबर गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यांच्याकडे आणखी गुन्हे तपासासाठी वाढतात. सायबर पोलिसांकडून स्थानिक पोलिस ठाण्यांकडे गुन्हे दाखल करण्यास पाठविल्यानंतर निरीक्षकांकडून काही दिवस त्याच्याकडे काणाडोळा केला जातो. त्यामुळे स्थानिक पोलिस ठाण्याकडे सायबर गुन्ह्यांचे अनेक अर्ज प्रलंबित आहेत. पोलिस ठाण्यांत गुन्हा दाखल झाल्यानंतरही त्याचा वेगाने तपास होताना दिसत नाही.

पाच ते सहा महिन्यांनंतर गुन्हे

एखाद्या व्यक्तीची सायबर चोरट्यांनी फसवणूक केल्यानंतर तो सायबर पोलिसांकडे अर्ज देतो. त्या ठिकाणी तपास करून तो अर्ज स्थानिक पोलिसांकडे पाठविला जातो; पण गुन्हा दाखल होण्यास प्रत्यक्षात सहा ते सात महिने जात असल्याचे दिसून आले आहे. सायबर चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी पाच ते सहा महिने लागत असतील तंत्रज्ञानात 'फास्ट' असणारे सायबर चोरटे कधी पकडणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

प्रत्येक अर्ज हा एक गुन्हा

सायबर पोलिसांकडे येणारा प्रत्येक अर्ज हा एक गुन्हा आहे. २०२१ मध्ये पुणे शहरातून १९ हजार अर्ज सायबर पोलिसांकडे आले होते. पण, त्यापैकी फक्त ८३ अर्जांबाबत सायबर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. ७५ अर्ज स्थानिक पोलिसांकडे गुन्हे दाखल करण्यासाठी पाठविले होते. तर, नऊ हजार आठ अर्जांमध्ये अद्याप चौकशी सुरू आहे. सायबर पोलिसांकडे येणाऱ्या प्रत्येक अर्जामध्ये गुन्हा दाखल करणे शक्य नाही. भविष्यात सायबर गुन्हे वाढतच जाणार आहे. त्यामुळे याकडे पोलिसांना विशेष लक्ष द्यावे लागणार आहे. सायबर पोलिसांकडे आलेल्या तक्रार अर्जाची चौकशी केल्यानंतर त्यामध्ये गुन्हा होत असेल तर दाखल करावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामध्ये तपास करून कार्यवाही करावी.

## जातीवाचक आडनावं बदलण्यासाठी 'ऑपरेशन सरनेम सर्जर' मोहीम

अहमदनगर : जातीयवाद संपविण्याच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून राज्य सरकारनं जातीवाचक गावं आणि वाड्या वस्त्यांच्या नावांमध्ये बदल करण्याची योजना आणली आहे. अनेक ठिकाणी यानुसार नावं बदलण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, अनेकांचीही आडनावं ही जातीवाचक असतात. ती बदलण्यासाठी नगरमधील पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीनं 'ऑपरेशन सरनेम सर्जरी' ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. या चळवळीद्वारे लोकांना प्रोत्साहन देऊन त्यांची अशी आडनावं बदलण्यासाठी मदत करण्यात येणार



आहे. एकाचववेळी मोठ्या संख्येनं असे बदल करून गॅझेटमध्ये आणि नंतर विविध कागदपत्रांवरील अडनावं बदण्याची ही मोहीम असल्याची माहिती संघटनेचे निमंत्रक ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.

यासंबंधी माहिती देताना ॲड. गवळी यांनी सांगितलं, 'अनेक आडनावे अशी आहेत की, त्यावरून त्या व्यक्तीची जात समजते. त्यावरून अनेकांचे सामाजिक अवमूल्यन होतं. त्यामुळे ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. तंत्रज्ञानानं प्लास्टिक सर्जरी करून माणसाच्या शरीरावरील विद्रूप भाग बाजूला करून नव्यानं सौंदर्य निर्माण करता येते. या तत्त्वावर ऑपरेशन सरनेम सर्जरी राबवली जाणार आहे. कारण जाती व्यवस्था हाही आपल्या समाजाला लागलेला कलंक आहे. भारतातील वर्ण आणि जाती व्यवस्थेमुळं माणसाचं सामाजिक अमुल्यन होतं. याला व्यक्तीचं आडनाव कारणीभूत ठरतं. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातही वर्ण आणि जातीव्यवस्था टिकून आहे.

## नुकतेच लग्न झाले; फिरायला गेले, सेल्फीच्या नादात गमावला जीव... नवदांपत्यासह तिघांचा बुडून मृत्यू

बीड: वडवणी तालुक्यातील कवडगाव येथे बंधारा नजीक सेल्फीचा मोह झाल्याने सेल्फी काढत असताना बंधाऱ्यात पाय घसरून पडल्याने तिघा जणांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना आज उघडकीस आली. या घटनेची माहिती कळताच पोलीस प्रशासनाने घटनास्थळी जाऊन बंधाऱ्यातील मृतदेहाचा शोध घेतला. मृतदेहांना बाहेर काढून पंचनामा केला आहे. या घटनेने वडवणी तालुक्यासह बीड जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.



वडवणी तालुक्यामध्ये एका खाजगी उर्दू शाळेतील शिक्षकाच्या मुलीचा विवाह काही दिवसांपूर्वी झाला होता. त्यानंतर मुलगी, जावई आणि त्यांचा एक मित्र घरच्यांना भेटण्यासाठी कवडगाव येथे आले. जेवण झाल्यानंतर जवळच असलेल्या एका नदीपात्राचा आणि त्या पाहण्याचा मोह झाल्याने त्या ठिकाणी सेल्फी काढण्यासाठी नवरा बायको आणि त्यांचा मित्र त्या ठिकाणी गेले. नदीपात्रातील मोठ्या प्रमाणात वाळू उपसा झाल्याने त्या ठिकाणी मोठमोठे खड्डे झाले होते. याच ठिकाणी त्यांचा पाय घसरून त्या खोल पाण्यामध्ये त्या तिघा जणांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

यामध्ये ताहा शेख ( २०,राहनार ढाकरगाव,ता. अंबड) सिद्दीकी शेख (२२,राहणार ढाकरगाव, अंबड) शहाब ( २५, ढाकरगाव ) असे मृत्यू झालेल्या व्यक्तींची नावे आहेत. यावेळेस त्यांच्यासोबत दोन चिमुकले देखील होते. सुदैवाने त्या दोन्ही चिमुकल्याला कोणतीही इजा झाली नसून ते सुखरूप आहेत. या घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. दीर्घ काळ प्रयत्न केल्यानंतर हे तीन मृतदेह बाहेर काढण्यात गावकऱ्यांना यश आले. पोलीस कर्मचारी आल्यानंतर हे तिन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले. या घटनेमुळे मात्र गावकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## आभासी सुनावणी होणार अधिक सक्षम




नागपूर : राज्याच्या कारागृहांतील बंदीवानांची आभासी पद्धतीने न्यायालयात होणारी सुनावणी आता अधिक सक्षम व विनाअडथळा पार पडेल. आभासी पद्धतीच्या या सुनावणीसाठी लागणाऱ्या साहित्य खरेदीकरिता गृह विभागाने तब्बल ४ कोटी २० लाख २१ हजार ८४० रुपयांचा निधी मंजूर केला आहे. यातून राज्यांतील विविध कारागृहांमध्ये आता साहित्यखरेदीची गती वाढेल.

करोनाकाळात आभासी पद्धतीने सुनावणीला वेग आला. परंतु आवश्यक ती साधने उपलब्ध नसल्याने अनेक अडचणी कारागृह प्रशासनासमोर उभ्या ठाकल्या. त्यांवर मात करण्यासाठी विविध पावले उचलण्यात आली. राज्यातील कारागृहांना यासाठी कोणकोणती साधने हवीत, याबाबत समिती स्थापन करण्यात आली. कारागृहाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक व महानिरीक्षकांनी साहित्यखरेदीचा प्रस्ताव तयार केला. आभासी पद्धतीसाठी २१० युनिट खरेदीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला. काही दिवसांपूर्वीच या प्रस्तावाला मान्यता देऊन चार कोटींचा निधी मंजूर करण्यात आला.

## ऐन उन्हाळ्यात औरंगाबादमध्ये पाणी प्रश्न पेटला, भाजपचं भांडी वाजवून आंदोलन



औरंगाबाद : उन्हाळ्यात नेहमी पाणी टंचाईच्या समस्येला सामोरं जावं लागतं. अशातचं, ऐन उन्हाळ्यात औरंगाबाद शहरातील पाणीटंचाईचा प्रश्न चांगलाच पेटला आहे. सिडको भागातील नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याने सिडको एन ५ येथील पाण्याच्या टाकीवर भाजपकडून आंदोलन करण्यात येत आहे. विशेष म्हणजे गेल्या दोन तासांपेक्षा अधिक वेळेपासून हे आंदोलन सुरू आहे. यावेळी तर निवेदन देण्यासाठी आंदोलनकर्त्यांनी महानगरपालिका आयुक्तांच्या घरावर धडक दिली.

औरंगाबाद शहरातील अनेक भागात नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यात उन्हाळ्याचे दिवस असताना पाच ते सहा दिवस अनेक भागात पाणी येत नाही. त्यामुळे गेल्या आठवड्यातच पुंडलिकनगर टाकीवर महिलांनी पाण्यासाठी आंदोलन केलं होतं. त्यानंतर सोमवारी भाजपने सिडको एन ५ येथील पाण्याच्या टाकीवर धडक देत आंदोलन केले. यावेळी महानगरपालिकेच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. तर मनपा आयुक्त आस्तिककुमार पांडे यांनी निवेदन घेण्यासाठी येण्याची मागणी केली. मात्र, या मागणीला प्रतिसाद मिळत नसल्याने आंदोलकांनी आयुक्तांच्या घरावर मोर्चा वळवला.

डोक्यावर हंडा घेऊन घोषणाबाजी

भाजपकडून सिडको एन ५ येथील पाण्याच्या टाकीवर आज सकाळी ९ वाजेच्या सुमारास आंदोलनाची सुरुवात झाली. यावेळी शेकडो भाजप कार्यकर्ते आणि नागरिकांनी पाण्याच्या टाकीच्या परिसरात ठिय्या आंदोलन केले. यावेळी महिलांनी डोक्यावर हंडा घेत घोषणाबाजी केली. तर भांडी वाजवत, 'पाणी आमच्या हक्काचे, नाही कुणाच्या बापाचे, देत कसं नाही मिळायलाच पाहिजे', अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या.


## मिरा भाईंदर महानगरपालिका

### उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/वृ.प्रा / ६७९ /2021-22 दिनांक :- ३०/०३/२०२२

**// जाहिर नोटीस सुचना //**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहिर करण्यात येत की मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकासकामात बाधीत होणारी/धोकादायक झाडे मुळासहित काढणे व पुर्न:रोपन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | संख्या |
| --- | --- | --- |
| 1. | भाईंदर (प.) राई गाव, गांधी तलाव, मधली आळी येथिल घराच्या आवारात 01 नग नारळ अंदाजे 55 ते 60 फुट उंच, 01 नग कडुलिंब अंदाजे 35 ते 40 फुट उंच वाढलेले असुन सदरचे नारळाचे झाड जोराच्या वा-याने बाजुच्या घरांवर झुकत असुन नारळ व झावळ्या पडुन पत्रे / कौले फुटुन नुकसान होत आहेत. तसेच 01 नग कडुलिंबाच्या झाडाला किड लागलेली असुन झाड बाजुच्या घरावर वाकलेले आहे. सदरची झाडे जोराच्या वाऱ्याने पडुन जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदर 02 नग झाडे तातडीने काढणे आवश्यक आहे. **(श्री.भगवान ज्ञानेश्वर पाटील यांचे दि.17/03/2022 रोजीचे पत्र.)** | 01 नग नारळ<br>01 नग कडुलिंब |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/स्थलांतरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसाच्या आत लेखी स्वरूपात उप-आयुक्त् (उदयान), उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, पहिला मजला, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे व mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही. तसेच सदरची सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

सही/ -
(योगेश गुणिजन)
सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र मनपा/जनसंपर्क/००१/२०२२-२३
दिनांक ०४/०४/२०२२

संपादकीय...



## स्वायत्ततेची ऐशी तैशी

केंद्रीय अन्वेषण विभागाची (सीबीआय) कार्यपद्धती आणि जनमानसातील प्रतिमेबाबत सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांनी केलेल्या टिप्पणीमुळे अनेक वर्षांनंतरही या 'पिंजऱ्यातल्या पोपटा'ची अजूनही सुटका व्हायला तयार नाही, हेच स्पष्ट झाले आहे. भ्रष्टाचार, अत्याचार, पारदर्शकतेचा अभाव आणि राजकीय लागेबांधे यामुळे तपास यंत्रणांची प्रतिमा डागाळली असल्याचे सुनावून त्यांनी एका अर्थाने 'सीबीआय'च्या व्यासपीठावर जनभावनेलाच शब्दरूप दिले. आतापर्यंत सर्वोच्च न्यायालय आणि अनेक उच्च न्यायालयांनी या मुद्द्यांचा वेळोवेळी परामर्श घेतला असून सुधारणेचे निर्देशही दिले; तरीही पुन्हा त्याच विषयावर बोट ठेवण्याची निकड सरन्यायाधीशांना भासते, त्यावरून या व्यवस्थेतच काही दोष आहेत, असाच त्याचा अर्थ निघतो. राज्यकर्ते धनी आपले हेतू साध्य करण्यासाठी, कधी बगलबच्चांना वाचविण्यासाठी, तर कधी विरोधकांवर नेम धरण्यासाठी या यंत्रणेच्या खांद्यावर बंदूक ठेवतात.



त्यामध्ये त्यांचे अल्पकालीन हेतू साध्य होत असतीलही; पण या बंदुकांचा भार वाहताना तपास यंत्रणारूपी खांदाच निखळण्याची वेळ येणे देशासाठी घातक ठरेल, ही चिंता न्या. रमणा यांच्या मांडणीतून ध्वनित झाली आहे. कोळसा गैरव्यवहाराच्या प्रकरणात २०१३ मध्ये मद्रास उच्च न्यायालयाने सीबीआयचे 'पिंजऱ्यातला पोपट' असे वर्णन केले. इतकेच नव्हे, तर सरकारी दडपणाविना स्वतंत्रपणे काम करण्यासाठी सीबीआयला अधिकार देण्याचा कायदा करावा आणि सीबीआय ही महालेखापालांप्रमाणे (सीएजी) थेट संसदेला उत्तरदायी असावी, असे सुचवत त्यासाठी अधिकारांसह पुरेसे मनुष्यबळ आणि निधीची तरतूद असे सविस्तर १२ कलमी निर्देशही दिले. त्यानंतर जागे झालेल्या केंद्र सरकारने सीबीआयच्या संचालकांच्या निवडीसाठी पंतप्रधान, सरन्यायाधीश आणि विरोधी पक्षनेते अशी त्रिसदस्यीय समितीही नियुक्त केली; तसेच निमलष्करी दलांच्या महासंचालकांइतकेच अधिकार सीबीआयच्या संचालकांनाही देऊ केले. मात्र, गेल्या वर्षी सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा याच प्रश्नांचा पुनरुच्चार केला, याचा अर्थ आठ वर्षांनीही परिस्थितीत सुधारणा झालेली नाही. त्यानंतरही सीबीआयच्या संचालकांच्या नियुक्तीमध्ये हस्तक्षेपाचे आरोप आणि न्यायालयीन प्रकरणे पुढे येतच आहेत. विशेष म्हणजे विरोधात असलेल्या भारतीय जनता पक्षाने 'काँग्रेस ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन' अशा शब्दांत काँग्रेस सरकारवर हल्ला चढविला होता. आता हाच भाजप सत्तेत असून ममता बॅनर्जी यांच्यासारखे विरोधक 'षड्यंत्र ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन' अशी टीका करीत आहेत, त्यावरून या यंत्रणांचा कळसूत्री बाहुल्यांप्रमाणे वापर केल्याचा आरोप आपल्यावर नाहीच, असा सोयीस्कर समज सर्वच पक्षांनी करून घेतलेला दिसतो. सध्या तर राजकारणातील वैरभाव टोकाला गेला असून तपास यंत्रणांचा राजकारणासाठी बिनदिक्कत वापर होत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यातूनच विरोधी पक्षांची सत्ता असलेल्या अनेक सरकारांनी आपल्या राज्यातील प्रकरणांच्या चौकशीचे सीबीआयला दिलेले अधिकारही काढून घेतले आहेत. त्यातून केंद्र विरुद्ध राज्य असा नवाच वाद उभा राहू पाहत आहे. महाराष्ट्रात गेल्या काही काळातील फोन टॅपिंग प्रकरण किंवा 'अमुकतमुक तुरुंगात जाणार,' ही राजकीय नेत्यांची भाषा याबाबतीत सगळे एकाच माळेचे मणी असल्याचे सांगते.

आपली प्रतिमा सुधारण्यासाठी या यंत्रणांनी राजकीय लागेबांधे तोडावेत, हे न्या. रमणा यांचे आवाहन नोकरशाहीतही राजकीय पाळेमुळे घट्ट रुजल्याचेच निदर्शक आहे. अनेक अधिकाऱ्यांवर राजकीय जवळिकीचे शिक्के मारण्यात येतात. राजवट बदलल्यावर आपल्याला त्रास होतो, अशी तक्रार अधिकारी करत असल्याचे उद्धृत करून 'आपले अधिकार सत्ताधाऱ्यांना बदाल केल्यावर त्याचे परिणाम भोगावे लागणारच,' अशा शब्दांत सरन्यायाधीशांनी त्यांचा समाचार घेतला, त्यामध्ये तथ्य आहे. कोणताही दुजाभाव न करता फक्त कायद्याचे पालन करण्याची भूमिका घेणाऱ्या आपल्या हितसंबंधांच्या आड येणाऱ्या अधिकाऱ्यांना बदली किंवा 'साइड पोस्टिंग' याहून मोठी शिक्षा होणार नाही, एवढे संरक्षण त्यांना घटनेने नक्कीच दिले आहे. आणि या शिक्षा आनंदाने भोगणारे अनेक अधिकारी असून त्यांच्यावरच यंत्रणांची विश्वासार्हता टिकून आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.सरकारी दडपण टाळण्यासाठी स्वायत्त संस्थेची उभारणी करून सर्व तपास यंत्रणा एकछत्री अखत्यारीत आणाव्यात, अशी सूचनाही न्या. रमणा यांनी या भाषणात केली.

## देश ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर होणारच

वेगवेगळ्या क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा झळाळता ठसा उमटवणाऱ्या तरुणाईच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या 'तरुण तेजांकित' या लोकसत्ताच्या कार्यक्रमाचे या वर्षीचे प्रमुख पाहुणे होते, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान. 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर यांनी घेतलेल्या त्यांच्या मुलाखतीतून शिक्षणाच्या क्षेत्रातील स्थानिक मुद्द्यांपासून ते जागतिक पातळीपर्यंतच्या संभाव्य वाटचालीच्या दिशा उलगडत गेल्या.

गेल्या आठ वर्षांपासून केंद्रीय मंत्री असूनही वादग्रस्त नाही असे माझ्याबद्दल सांगण्यात आले. मी खूप कमी बोलतो त्यामुळे आपोआपच वादविवादांपासून दूर राहतो. लोकशाहीत देशासाठी काम करण्याची संधी मिळणे ही खूप मोठी गोष्ट असते. पंतप्रधानांचा विश्वास संपादन करणारी व्यक्ती मंत्रिमंडळात निवडली जाते आणि तो विश्वास कायम राहील असे काम करत राहिल्यानेच गेल्या आठ वर्षांपासून मंत्रिमंडळात आहे.

**डॉ. काकोडकरांचे मार्गदर्शन**

जगात आता तंत्रज्ञान वेगाने बदलत आहे. त्यातून ऊर्जा प्रारूप बदलत आहे. सौरऊर्जा, जैविक ऊर्जा, हायड्रोजन ऊर्जा ही नवीन ऊर्जासाधने पारंपरिक ऊर्जासाधनांना पर्याय देण्याचा प्रयत्न करत आहेत. मला अजूनही आठवते की पेट्रोलियम मंत्री झाल्यानंतर मी ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांना भेटीचे निमंत्रण दिले व एका विद्यार्थ्यासारखा त्यांच्याकडून हायड्रोजन ऊर्जा हा विषय समजून घेतला. त्यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि सविस्तरपणे मला हायड्रोजन ऊर्जेचे स्वरूप, त्या तंत्रज्ञानाची सद्य:स्थिती व संशोधनातील प्रगती व त्याचे भविष्यातील महत्त्व हे सारे समजावून सांगितले. आज आठ वर्षांनंतर आपण हायड्रोजन ऊर्जेच्या संशोधनात बराच मोठा टप्पा गाठला आहे.

**बाजारपेठेतून आत्मनिर्भरता**

जागतिक परिस्थिती व भारतातील संशोधनाचे स्वरूप पाहता तो दिवस दूर नाही की भारत ऊर्जाक्षेत्रातील एक नवे प्रारूप जगाला भेट म्हणून देईल. स्थानिक बाजारपेठ असली की संशोधनाला अधिक वाव मिळतो आणि त्याला व्यावसायिक यश मिळणेही सोपे जाते. भारताची ऊर्जेची देशांतर्गत बाजारपेठच खूप मोठी आहे. त्यामुळे नवीन संशोधनातून भारत लवकरच ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर होईल, असा विश्वास वाटतो.

**ब्रेन ड्रेन ते ब्रेन बँक!**

भारतातून उच्चशिक्षित तरुण-तरुणी परदेशात जातात यावरून ब्रेन ड्रेनची चर्चा सुरू असते. पण ज्ञानाची आयात-निर्यात ही जगात सुरूच असते हे आपण लक्षात घ्यायला हवे. प्राचीन काळापासून भारत हा जगाला ज्ञानाची निर्यात करत आला आहे. भारताच्या गुणसूत्रांतच ज्ञान निर्यात आहे. स्थलांतरामुळेही एका ठिकाणचे ज्ञान-कौशल्य दुसरीकडे जाते. पारशी भारतात, मुंबईत आले आणि येताना त्यांचे ज्ञान व कौशल्य घेऊन आले. त्याचा भारताच्या प्रगतीत मोठा लाभ झाला. भारत अशा रितीने एक सर्वसमावेशक राष्ट्र आहे. त्यामुळे आपण सध्या ज्याला ब्रेन ड्रेन म्हणतो त्याचा वेगळा विचार करून ती देशासाठी ब्रेन बँक कशी होईल याचे नियोजन करावे लागेल व ते आम्ही करणार आहोत. देशातील नागरिकांच्या आशा-आकांक्षा वाढत आहेत. राजकीय स्थैर्यामुळे आणि गुंतवणुकीस अनुकूल धोरणांमुळे भारताची प्रतिष्ठा जगात वाढत आहे. आता युक्रेन व रशिया संघर्षांत मंदसौरचा गहू जागतिक पातळीवर जात असून त्याची मागणी वाढली आहे.

आता राहिला प्रश्न उच्च शिक्षणासाठी आपल्या मुलांनी परदेशी जाण्याचा. तर खरे पाहता दरवर्षी चार कोटी लोक उच्चशिक्षण घेतात व त्यापैकी दहा लाख मुले परदेशी शिकायला जातात. उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे एकूण प्रमाण व त्यापैकी परदेशी जाणारे असा विचार केला तर ते प्रमाण किती कमी आहे हे लक्षात येईल. पुढील दहा वर्षांत उच्चशिक्षण घेणाऱ्या मुलांचे प्रमाण आपल्याला १० कोटींवर न्यायचे आहे. त्यासाठी आपल्याला देशात उच्च शिक्षणाच्या चांगल्या सुविधा निर्माण कराव्या लागतील याबाबत दुमत नाही. त्याचबरोबर आणखी एक बदल करावा लागेल. तो म्हणजे सध्या आपले शिक्षण पदवीकेंद्रित झाले असून ते आपल्याला रोजगारकेंद्रित करावे लागेल. आज प्रत्येक उच्चशिक्षण संस्था ही प्लेसमेंट म्हणजेच त्यांच्याकडील किती पदवीधर मुलांना लगेचच नोकरी मिळाली यावर बोलत असते. नोकरी निर्माण करणारे पदवीधर आपण कधी तयार करणार, हा खरा प्रश्न आहे. उद्योजक तयार होतील अशा आयसीटीसारख्या विविध क्षेत्रातील संस्था उभ्या राहणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्याला समाजाची मानसिकता बदलावी लागेल. एखादा दहावी उत्तीर्ण तरुण चांगला व्यावसायिक-उद्योजक असेल व लाखो रुपये कमवत असेल तरी पदवीधर मुली व त्यांचे पालक असे स्थळ स्वीकारत नाहीत हे वास्तव आहे. ही मानसिकता बदलणे गरजेचे आहे.

**उच्चशिक्षण शुल्क व्यवस्थेचा विचार**

उच्चशिक्षणातील पद्धतीबरोबरच कधी ना कधी आपल्याला त्यातील शुल्क व्यवस्थेचाही विचार करावा लागणार आहे. दिल्ली विद्यापीठ हे सरकारी विद्यापीठ आहे. राष्ट्रपती, केंद्रीय मंत्री, वरिष्ठ नोकरशहा आणि त्याचबरोबर




सामान्य माणसाचा, एखाद्या शेतकऱ्याचा मुलगाही या विद्यापीठात शिक्षण घेऊ शकतो. विशेष म्हणजे या सर्वाना त्यासाठी एकच म्हणजे समान शुल्क आकारले जाते. यात एक गुंतागुंत आहे. अतिश्रीमंत आणि सर्वसामान्य किंवा गरिबांना एकच शुल्क आकारून कसे चालेल हा विचार करण्याची वेळ आली आहे. सरकारी खर्चाने कोणाला शिकवायचे आणि कोणी आपल्या उच्च शिक्षणाचा पूर्ण भार उचलायचा याचा विचार झाला पाहिजे. याचा अर्थ लगेचच आम्ही शुल्क नियमन करायला निघालो आहोत असा नव्हे. पण आपल्याला समाज म्हणून हा विचार करावा लागेल हा मुद्दा आहे. ज्यांची आर्थिक क्षमता आहे त्यांनी सरकारी खर्चाने शिक्षण घेऊ नये ही संकल्पना आहे. गॅस अनुदानाबाबत आपण हा प्रयोग यशस्वी केला आहे. लाखो श्रीमंतांनी गॅस सिलिंडरवरील अनुदान स्वेच्छेने सोडले. तोच विचार उच्च शिक्षणात करता येईल.

**कोणाच्याही दयेवर नाही**

आज भारत हा जगातील एक महत्त्वाचा देश झाला आहे. भारत आता कोणाच्या दयेवर जगत नाही. राजकीय स्थैर्य, धोरणसातत्य आणि बाजारपेठ म्हणून देशाची खरेदी क्षमता ही जगातील इतर राष्ट्रांना व मोठ्या गुंतवणूकदारांना खुणावत आहे. या परिस्थितीचा देशाला लाभ व्हावा यासाठी आम्ही काम करत आहोत.

**नाणारबाबत मनपरिवर्तन**

मी पेट्रोलियममंत्री असताना नाणार येथे सौदी व संयुक्त अरब अमिरातीच्या सहकार्याने व आपल्या तेल कंपन्यांच्या भागीदारीत पेट्रोलियम पदार्थासाठी एक विशाल तेलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव तयार झाला. ६० दशलक्ष लिटर क्षमतेचा हा प्रकल्प होता. त्याबाबत सामंजस्य करार झाला. पण त्यावेळी सत्तेतील आमचा सहकारी पक्ष असलेल्या शिवसेनेने स्थानिकांच्या आंदोलनाला साथ देत प्रकल्पाला विरोध केला. त्यातून तो प्रकल्प बारगळला. महाराष्ट्रासह देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाच्या असलेल्या या प्रकल्प उभारणीचा बहुमोल वेळ वाया गेला. पण आता महाराष्ट्रात शिवसेनेच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकार आहे. या सरकारचे या तेलशुद्धीकरण प्रकल्पाबाबत मनपरिवर्तन झाल्याचे संकेत मिळत आहेत. 'देर आए लेकिन दुरुस्त आए' या न्यायाने शिवसेनेच्या या मनपरिवर्तनाचे स्वागतच केले पाहिजे. या तेलशुद्धीकरण प्रकल्पामुळे जवळपास तीन लाख कोटी रुपये महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत पुढील काही वर्षांत येऊ शकतात. तेलशुद्धीकरण प्रकल्पातील थेट रोजगाराबरोबर प्रकल्प उभारणीच्या आनुषंगिक गोष्टींमधून हजारो लोकांना रोजगार मिळेल. शिवाय प्रकल्प सुरू झाल्यावर त्याच्याशी निगडित पूरक उद्योग उभे राहतील व त्यातही मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होईल.

## पाकिट चोरल्याच्या संशयातून नालासोपाऱ्यात भर रस्त्यात जमावाकडून महिलेला मारहाण

### नागरिकांच्या आरोपावरून सदर महिलेला तुळिंज पोलिसांनी ताब्यात घेऊन तिची चौकशी सुरू केली आहे.




नालासोपारा : नालासोपाऱ्यात भर रस्त्यात जमावाकडून एका महिलेला मारहाण (Beating) केल्याची घटना घडली आहे. नालासोपारा पूर्व ओसवाल नगरी सेंटर पार्क रस्त्यावरील रविवार बाजारात आज सायंकाळी 6:30 च्या सुमारासची ही घटना घडली. संबंधित महिलेने बाजारात गर्दीचा फायदा घेऊन पाकिट (Wallet) चोरल्याचा तिच्यावर आरोप लावण्यात आला आहे. तुळिंज पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन महिलेला ताब्यात घेतले असता महिलेने पोलिसांसोबत देखील हातापाई करत नख मारली असल्याचे समोर आले आहे.

पोलीस कर्मचाऱ्याच्या हाताला व पायाला महिलेची नख लागली आहेत. नागरिकांच्या आरोपावरून सदर महिलेला तुळिंज पोलिसांनी ताब्यात घेऊन तिची चौकशी सुरू केली आहे. त्यामुळे ही महिला चोरच आहे की या मारहाणी पाठिमागे अन्य काही कारण आहे हे पोलीस तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. भर बाजारात महिलेला मारहाण होताना बघ्यांची गर्दी मात्र मोठ्या प्रमाणात झाली होती.

वर्ध्यात वाळू चोरताना हटकल्याने सरपंचाला मारहाण

गावात सुरु असलेल्या विकास कामांच्या जागेवरील वाळू उचलून नेत असताना हटकले असता सरपंचाला शिवीगाळ करीत दगड डोक्यात घालून जखमी केल्याची घटना वर्ध्यातील वायफड येथे घडली आहे. विजय रामदास राऊत (27) असे जखमी सरपंचाचे नाव आहे. गावात रस्त्याच्या बांधकामासाठी वाळू आणून ती रस्त्याकडेला कंत्राटदाराने ठेवली होती.

आरोपी अरुण बावणे हा रस्त्याकडेला ठेवलेली वाळू चोरून नेत होता. सरपंच विजय राऊत यांनी त्याला पाहिले असता त्याला हटकले. यावेळी आरोपीने त्यांना शिवीगाळ करून प्लास्टिक टोपल्याने आणि दगडाने डोक्यावर मारहाण करीत जखमी केले. याबाबत पुलगाव पोलिसांत तक्रार दाखल केली असून पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## धमकी देत महिलेवर अत्याचार, राष्ट्रीय आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षकावर गुन्हा दाखल



हिंगोली जिल्ह्यातल्या सेनगाव येथील एका महिलेचे मोबाइलवर फोटो काढून धमकी देत तिच्यावर अत्याचार करणाऱ्या एका आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षकाविरुद्ध हिंगोली ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. स◌ेनगाव तालुक्यातील वाघजाळी येथील एक महिला तिच्या कुटुंबीयांसोबत सेनगाव येथे वास्तव्यास राहात होती. राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक मारुती शिवाजी कोटकर याने चार वर्षांपासून त्याच भागात राहणाऱ्या एका महिलेशी जवळीक साधली. मी तुमचा नातेवाईकच आहे, असे सांगितले. त्यानंतर त्या महिलेचा पती घरी नसताना महिलेच्या घरी जाऊन तिचे मोबाइलवर फोटो देखील काढले, अशी माहिती पोलिसांनी दिली. फ◌ोटो जाहीर करण्याची धमकी देऊन शिक्षकाने महिलेवर सतत अत्याचार केले, असा आरोप आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी सदर महिलेला उपचारासाठी हिंगोली येथे आणले असता मारुती कोटकर याने त्या महिलेशी संपर्क साधून लग्नाचे आमिष दाखवले आणि पळवून नेले. त्यानंतर महिलेस अहमदनगर, नाशिक आणि दापोलीसह इतर ठिकाणी नेऊन अत्याचार केले. शेती नावावर करून देतो, यासह अनेक आमिष त्याने महिलेला दाखवले. या प्रकरणी या महिलेच्या कुटुंबीयांनी हिंगोली ग्रामीण पोलीस ठाण्यात महिला बेपत्ता झाल्याची तक्रार दिली होती.प◌ोलीस अधीक्षक राकेश कलासागर सहाय्यक, पोलीस अधीक्षक येतीस देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हिंगोली ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आर.एन. मळघणे अधिक तपास करत होते. महिला सापडल्यानंतर तिने या संदर्भात हिंगोली ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार केली. त्यावरून पोलिसांनी मारूती कोटकर विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षकाने केलेल्या या कृत्यामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

## वडिलांनी मुलाला गिफ्ट दिलेली मालमत्ता 'वडिलोपार्जित संपत्ती' नाही; मुंबई हायकोर्टाचे मत

मुंबई : वडिलोपार्जित संपत्ती (Property)वरुन कुटुंबात होणाऱ्या वादाच्या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालया एका प्रकरणात महत्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे. वडिलांनी स्वतःच्या मिळकतीतून जी संपत्ती कमावलेली असते, त्यातील काही मालमत्ता जर मुलाला गिफ्ट म्हणून देण्यात आली असेल तर अशा मालमत्तेला वडिलोपार्जित मालमत्ता म्हणता येणार नाही. त्यामुळे मुलाला वडिलांनी गिफ्ट केलेल्या मालमत्तेवर मुलीला हक्क सांगता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. याचवेळी या प्रकरणातील मुलाला न्यायालयाची परवानगी घेतल्याशिवाय संबंधित मालमत्ता न विकण्याचा आदेशही दिला आहे.



वडिलांच्या निधनानंतर तीन भावंडामध्ये संपत्तीवरुन सुरु होता वाद डॉक्टर वडिलांच्या मृत्यूनंतर एक भाऊ व दोन बहिणी अशा तिघा भावंडांत मालमत्तेच्या हक्कावरून वाद सुरू झाला. हे प्रकरण नुकतेच उच्च न्यायालयापुढे सुनावणीला आले होते. त्यावेळी न्यायालयाने बहिणींची मागणी अंशतः मान्य केली आणि मुलाला वडिलांनी गिफ्ट दिलेली मालमत्ता 'जैसे थे' स्थितीत ठेवण्याचे आदेश दिले. न्यायालयाच्या परवानगीशिवाय संबंधित मालमत्ता विकू नये किंवा त्यावर तृतीय पक्षाचा हक्क बनवू नये, असे न्यायालयाने निकाल देताना स्पष्ट केले. वडिलांनी संबंधित फ्लॅट कुटुंबाच्या पैशांतून आणि कर्ज घेऊन खरेदी केला होता. भावाने वडिल जीवंत असताना त्यांना अंधारात ठेवून तो फ्लॅट हडपला, असा दावा करीत गेल्यावर्षी दोन बहिणींनी 71 वर्षीय भाऊ व त्याच्या मुलाविरुद्ध खटला दाखल केला. त्यावर बहिणी खरी माहिती दडपत असल्याचा दावा भावाने केला. या भावंडांच्या वडिलांचे 2006 मध्ये तर आईचे 2019 मध्ये निधन झाले होते.

**न्यायालयात 71 वर्षीय भावाचा युक्तिवाद**

भावाने न्यायालयात युक्तीवाद केला की, त्याला वडिलांनी स्वत:च्या मिळकतीतून खरेदी केलेले तीन प्लॅट्स गिफ्ट दिले होते. बहिणींनी सुरुवातीला यावर कुठलाही आक्षेप घेतला नाही. मात्र गिफ्ट दिलेल्या फ्लॅटची विक्री केल्यानंतर बहिणींनी हक्कासाठी न्यायालयात धाव घेतली आहे.

## वीज दुरुस्ती करताना कर्मचाऱ्याचा क्षणात मृत्यू



नांदेड : देगलूर तालुक्यातील शहापूर इथे वीज वितरण कर्मचाऱ्याचा विजेच्या धक्क्याने दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी विजेच्या खांबावर चढून काम करीत असताना हा अपघात घडला आहे. वरिष्ठ तंत्रज्ञ असणारे ज्ञानेश्वर ताटे वीजेच्या खांबावर काम करत असताना वीज प्रवाह सुरू झाल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.हे काम करत असताना यासाठी फोन परमिट घेण्यात आले होते. तरीही वीज प्रवाह कसा सुरू झाला, याचे नेमके कारण काय? याची चौकशी होणं गरजेचं आहे. दरम्यान, मृत्यू झाल्यानंतर त्या घटनेची दखल घेऊन मृतदेह खांबावरून खाली घेणं गरजेचं होतं. पण या अपघातानंतर बराच वेळ ज्ञानेश्वर ताटे यांचा मृतदेह खांबावर लोंबकळत होता.यामुळे संपूर्ण गावात खळबळ उडाली असून या घटनेचा पोलीस तपास सुरू असल्याची माहिती आहे.

# मुलगी निहारिका कोनिडेलाला पबमध्ये ताब्यात घेतल्यानंतर नागा बाबूची प्रतिक्रिया

### निहारिकासह बिग बॉस तेलुगु विजेता राहुल सिपलीगंजलाही पोलिसांनी ताब्यात घेतलेय

नवी दिल्ली : साऊथ इंडस्ट्रीतील प्रसिद्ध अभिनेते आणि दिग्दर्शक नागा बाबू (Naga Babu)ची मुलगी आणि अभिनेत्री निहारिका कोनिडेला (Niharika Kodinela)ला रविवारी पहाटे हैदराबाद पोलिसांनी ताब्यात घेतले. नागा बाबू यांनी आपल्या मुलीचा ड्रग्जशी काहीही संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. “माझी मुलगी निहारिका हिला काल रात्री एका पंचतारांकित हॉटेलमधील पबमध्ये उपस्थित असल्याबद्दल ताब्यात घेण्यात आले. निर्धारित वेळेनंतरही पब सुरु ठेवल्याने पोलिसांनी व्यवस्थापनावर कारवाई केली. तथापि, पोलिसांनी पुष्टी केली आहे. या पबमधून जप्त करण्यात आलेल्या ड्रग्जचा त्यांच्याशी काहीही संबंध नाही.” असे नागा बाबूने आपल्या निवेदनात म्हटले आहे. निहारिकाला पोलिसांनी ताब्यात घेतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल



निहारिकासह बिग बॉस तेलुगु विजेता राहुल सिपलीगंजलाही पोलिसांनी ताब्यात घेतलेय. बंजारा हिल्स येथील रॅडिसन ब्लू प्लाझा हॉटेलमधील मिंक पबमध्ये रविवारी पहाटे 3 वाजता हैदराबाद पोलिसांनी छापा टाकून एकूण 150 जणांना ताब्यात घेतले. यावेळी पबच्या परिसरातून लाखो रुपयांचे ड्रग्जही पोलिसांनी जप्त केले आहे. निहारिका आणि राहुलने ड्रग्ज घेतले होते की नाही याबाबत अद्याप पोलिसांनी माहिती दिली नाही. याबाबत नागा बाबू यांनी स्पष्टीकरण दिले आहे. निहारिकाला पोलिसांनी ताब्यात घेतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

निहारिकाला ताब्यात घेतल्याच्या वृत्ताला हैदराबाद पोलिसांकडून दुजोरा

निहारिकाला ताब्यात घेतल्याच्या वृत्ताला हैदराबाद पोलिसांनी दुजोरा दिला आहे. टास्क फोर्सने शनिवारी रात्री उशिरा रात्री पार्टी करणे आणि ड्रग्सचे वितरण केल्याच्या आरोपावरून शहरातील पंचतारांकित हॉटेलच्या पबवर छापा टाकला. काल रात्री सुमारे 150 लोक एका पबमध्ये पार्टी करत होते. मध्यरात्रीनंतर पब चालवण्यास परवानगी नाही, असे पोलिसांनी सांगितले.

## पुण्यात गुंडांचा उच्छाद, फुकट भाजी न दिल्याने तरुणाला पाया पडायला लावलं



पुणे : पुण्यात गुंडांच्या (Pune Crime) दादागिरीचे व्हिडीओ अनेक वेळा समोर येताना दिसतात. धनकवडी परिसरात गुंडांनी भाजी विक्रेत्याला पाया पडायला (Goons) लावल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. फुकट भाजी दिली नाही, म्हणून गुंडांनी भाजीवाल्याला लोटांगण घालायला लावल्याची माहिती आहे. हा व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट करुन गुंडांनी दहशत पसरवण्याचा प्रयत्न केला. धनकवडी भागात बालाजी नगर येथील रजनी कॉर्नरजवळ घडलेल्या या घटनेने सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे. या घटनेचे चार व्हिडीओ समोर आले आहेत. भाजी विक्रेत्या तरुणाला त्याच्या आईसमोरच कपडे फाटेस्तोवर मारहाण करत पाया पडायला लावल्याचं एका व्हिडीओत दिसत आहे. बालाजी नगरमधील गुलमोहर अपार्टमेंटसमोर हा प्रकार घडला.

कोयते दाखवून दहशत माजवली

दुसऱ्या व्हिडीओमध्ये बाईकस्वार गुंडांनी अन्य दुचाकीवर बसलेल्या तरुणावर हल्ला केल्याचं दिसतं. हातात कोयते घेऊन ही टोळी दहशत माजवताना दिसत आहे. असे प्रकार परिसरात सर्रास घडत असल्याचा दावा स्थानिक नागरिकांनी केला आहे. मारहाण झालेल्या तरुणाचा शोध घेऊन पोलीस तक्रार दाखल करणार आहेत.

## महिला ग्राहकांचे नंबर घेऊन व्हिडीओ कॉल

### बायकांनी दुकानात घुसून ‘पुष्पराज’ला फोडला



बदलापूर : दुकानात घुसून महिलांनी दुकानदाराला मारहाण (Beaten up) केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ठाणे जिल्ह्यातील बदलापूर शहरात ही घटना घडली. दुकानदार त्याच्या दुकानात आलेल्या महिलांकडून मोबाईल नंबर घ्यायचा. त्यानंतर त्यांना व्हिडीओ कॉल (Video Call) करुन त्रास द्यायचा, अशी तक्रार समोर आली होती. दुकानदाराच्या घृणास्पद कृत्यांमुळे संतापलेल्या महिलांनी थेट दुकानात हल्लाबोल चढवला. त्यानंतर दुकानदाराला चांगलाच ‘प्रसाद’ दिला. पुष्पराज परिहार असे महिलांचा चोप मिळालेल्या दुकानदाराचं नाव आहे. पोलिसांनी पुष्पराज याच्याविरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल करत त्याला अटक केली आहे. बदलापूरच्या पश्चिम भागातील आशीर्वाद हॉस्पिटल समोर अनामिका नोवेल्टी नावाचं स्टेशनरी शॉप आहे. या दुकानात आलेल्या महिलांकडून दुकानदार पुष्पराज परिहार हा त्यांचे नंबर काहीतरी निमित्ताने घ्यायचा आणि नंबर सेव्ह करून ठेवायचा.

व्हिडीओ कॉल करुन महिलांना त्रास

त्यानंतर या महिलांना व्हिडिओ कॉल करून पुष्पराज त्रास द्यायचा अशा काही तक्रारी समोर आल्या होत्या. त्यामुळे स्थानिक महिलांनी रविवारी संध्याकाळी पुष्पराज याला दुकानात जाऊन चोप दिला, तसंच माफी मागायला भाग पाडलं.

## प्रेयसीच्या नवऱ्याशी फेसबुकवर मैत्री, भेटायला बोलावून हत्या




रांची : प्रियकराने प्रेयसीच्या पतीची हत्या (Girlfriend’s Husband killed) केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. झारखंडमधील धनबादमध्ये हा प्रकार घडला आहे. पान मसाला व्यापारी मुकेश पंडित (Mukesh Pandit Murder) यांची 26 मार्च रोजी हत्या करण्यात आली होती. गोळी झाडून त्यांचा खून करण्यात आला होता. धनबाद पोलिसांनी या प्रकरणाचे गूढ उकलले आहे. मुकेश यांची पत्नी नीलम देवी आणि तिचा प्रियकर उज्ज्वल शर्मा यांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. फेसबुकवर मुलीच्या नावे अकाऊण्ट ओपन करत पंडित यांना उज्ज्वलने भेटायला बोलावरले होते.

## नागपूरच्या बिशॉप कॉटन स्कूलमध्ये तोडफोड



नागपुरात गुंडांचा हैदोस कमी होण्याचं नाव घेत नाही. आता तर चक्क शाळेलाच निशाणा बनविण्यात आलाय. धरमपेठ येथील (Dharampeth) व्हीआयपी रोडवरील बिशॉप कॉटन स्कूलला (Bishop Cotton School) दोन दिवस सुट्टी होती. मात्र आज सकाळी शाळा उघडताच शाळेच्या आवारात असलेल्या कुंड्या तोडण्यात आल्याचे दिसल्या. एक दोन नाही तर दिसेल ती कुंडी अज्ञात इसमांनी तोडली.

## छावा संघटनेच्या जिल्हाध्यक्षांचा पुतण्या बेपत्ता, अल्पवयीन मुलाचा रविवार रात्रीपासून शोध सुरु



अकोला : छावा संघटनेचे अकोला जिल्हा अध्यक्ष रणजित काळे पाटील यांचा अल्पवयीन पुतण्या बेपत्ता (Minor Boy Missing) आहे. काल (रविवार तीन एप्रिल) रात्रीपासून तो राहत्या घरातून बेपत्ता झाल्याची माहिती. संभाजी काळे असं 13 वर्षीय मुलाचं नाव आहे. तो अकोल्यातील सांगळूद येथून बेपत्ता झाला आहे. संभाजी काळे अकोल्यातील (Akola Crime) स्कूल ऑफ स्कॉलरमधे इयत्ता सहावीत शिकत आहे. तो स्वतःहून घर सोडून गेला, की त्याचं अपहरण (Kidnap) झालं, हे अद्याप अस्पष्ट आहे. मात्र तो घर सोडून पळाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. संभाजी काळे याचा फोटो कुटुंबीय आणि पोलिसांकडून जारी करण्यात आला आहे. कोणालाही त्याच्याविषयी माहिती मिळाली किंवा तो सापडला, तर जवळच्या पोलिसांशी संपर्क साधण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.
छावा संघटनेचे अकोला जिल्हा अध्यक्ष रणजित काळे पाटील यांचा पुतण्या बेपत्ता झाला आहे.

## नवरदेवाची फसवणूक; लग्नाच्या दुसऱ्या दिवशी नववधू रोकड आणि दागिने घेऊन फरार



आज काल तरुणांना लगीन घाई महागात पडतेय. कारण लग्न करायच म्हटलं तरी नवरदेवाला आपल्यावर संक्रात .येणार नाही ना याची काळजी घ्यावी लागणार आहे बहुतेक.. कारण नवरदेवाची लग्नाच्या नावाखाली फसवणूक होण्याच्या घटना वाढतच चालल्यात.. असचा एक धक्कादायक प्रकार घडला जालन्यात. बिचाऱ्या नवरदेवावर लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी डोक्याला हात लावण्याची वेळ आली.. जालना जिल्ह्याच्या भोकरदन तालुक्यातील पारध पोलीस स्टेशन हद्दीमधील शेलुद येथील शेतकरी परिवारामधील युवकाचा दोन दिवसांपूर्वी हिंगोली जिल्ह्यातील नववधु सोबत गावातील एका मंदिरात विवाह झाला. .दिवसभर सगळा परिवार लग्नाच्या धामधुमीत असताना लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी नववधू रात्रीच्या वेळी रोख रक्कम व अंगावरील सोन्याचे दागिने असे जवळपास 3 लाखांचा मुद्देमाल घेऊन रफुचक्कर झाली. घडलेल्या या घटनेने काकडे कुटुंबियांना चांगलाच धक्का बसला. नवरी आणि तिच्या सोबत असलेल्यांविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अशा घटनांमुळे लग्न करताना वधु काय आणि वर काय दोन्हीही बाजुची चौकशी होण तेवढीच गरजेची आहे. पण अशा फसवणूकीच्या घटनांमुळे लग्नासारख्या सुखद क्षणाला गालबोट लागतय हे नक्की.

## पंढरपूरमध्ये पत्नी नांदायला येत नाही म्हणून पतीकडून जीवे मारण्याचा प्रयत्न




सोलापूर : पत्नी नांदायाला येत नाही म्हणून पती (Husband)ने पत्नी (Wife)च्या गळयावर ब्लेड (Blade) मारून तिला ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना पंढरपूरमध्ये घडली आहे. नागेश विष्णु देवकुळे असे आरोपी पतीचे नाव आहे. तर बासमती नागेश देवकुळे असे पीडित पत्नीचे नाव आहे. हल्ल्यात जखमी झालेल्या पत्नीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी पंढरपूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी नागेशला तात्काळ अटक करत न्यायालयात हजर केले. न्यायालयाने नागेशला चार दिवस पोलिस कोठडी सुनावली आहे.

सासूच्या छळाला कंटाळून माहेरी आली होती महिला

बासमती हिची सासू छाया विष्णू देवकुळे ही सतत तिला घरकामावरुन, मूलबाळ होत नाही म्हणून शारिरीक आणि मानसिक त्रास द्यायची. याच छळाला कंटाळून बासमती सासरचे घर सोडून माहेरी गेली होती.

## गोरेगावमधील एसबीआयचे एटीएम लुटणाऱ्या दोघांना अटक



मुंबई : मुंबईतील गोरेगाव पूर्व वनराई पोलिसांनी एसबीआय एटीएम (SBI ATM) सेंटरवर दरोडा टाकणाऱ्या आणि पुरावे नष्ट करण्यासाठी एटीएम सेंटरला आग लावणाऱ्या दोन आरोपींना अटक (Arrest) केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये एटीएममधील कॅश लोडरचा समावेश आहे. गोरेगाव पूर्व आरपीएफ केंद्राला लागून असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एटीएम मशीनमध्ये 10 फेब्रुवारी रोजी सकाळी 10 वाजता अचानक आग लागली होती. आगीचा तपास करताना एटीएम मशिनमधील कॅश गायब असल्याचे पोलिसांना कळाले. त्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत चोरीचा उलगडा केला.

कॅश लोडरनेची केली चोरी

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक केलेल्या आरोपींनी एटीएममध्ये कॅश लोड करण्याच्या बहाण्याने 77 लाख रुपये लुटले होते. या लोकांनी हा दरोडा घातला आहे.

## बाजारात गेलेला नवरा परतलाच नाही, दुसऱ्या दिवशी रस्त्यात मृतदेह आढळला



नाशिक : डोक्यात दगड घालून शेत मजुराची हत्या (Murder) केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. नाशिक जिल्ह्यात सटाणा शहरालगत असलेल्या कंधाने फाट्यावर हा प्रकार (Nashik Crime) घडला. घमाजी रघुनाथ माळी असे मयत शेत मजुराचे नाव आहे. बाजारासाठी गेल्यानंतर घरी परतले नसल्याने कुटुंबीयांकडून घमाजी यांचा शोध सुरु होता. कंधाने फाट्यावरील एका शेतात रविवारी सकाळी रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह आढळल्यानंतर एकच खळबळ उडाली. ओळख पटू नये म्हणून दगडाने तोंड ठेचण्यात आले होते. हा मृतदेह घमाजी माळी यांचा असल्याचं समोर आलं. मात्र माळी यांच्या हत्येचं नेमकं कारण अद्याप अस्पष्ट आहे. घटनास्थळी सटाणा पोलिसांनी पंचनामा करत पुढील तपास सुरु केला आहे. सटाणा शहरापासून काही अंतरावर असलेल्या कंधाने फाट्याजवळील हॉटेलच्या पाठीमागे 40 वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळला. घमाजी रघुनाथ माळी (रा. पिंगळवाडे, ता. बागलाण) असे मयत व्यक्तीचे नाव आहे.

घरी परत न आल्याने शोधाशोध

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार मोरेनगर शिवारातील शेतकरी सुदर्शन सोनवणे यांच्या शेतात शेत मजूर म्हणून काम करत असलेले घमाजी माळी शनिवारी बाजारहाटासाठी बाहेर गेले होते. मात्र रात्री उशीर झाल्यानंतरही पती घरी परत न आल्यामुळे पत्नीने त्यांचा सर्वत्र शोध सुरु केला. परंतु ते कुठेही आढळले नाहीत.

मोकळ्या जागेत मृतदेह

रविवारी सकाळी आठ वाजताच्या सुमारास कंधाने फाट्याजवळ असलेल्या हॉटेल गुरुप्रसादच्या मागे मोकळ्या जागेत माळी यांचा मृतदेह सापडला. डोक्यात दगड घालून अतिशय निर्घृण पद्धतीने त्यांची हत्या करण्यात आली होती. घमाजी माळी शनिवारी रात्री कुठे गेले होते, कोणासोबत होते, त्यांचे कोणाशी वैर होते का, याचा तपास पोलीस करत आहेत.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत).संपर्कः-9594418181 / 8424989898